लोकमत

# वाडा-पालघरमध्ये हजार वृक्षांचे रोपण

लोकमत न्यूज नेटवर्क



**मुंबई** : जुलै महिन्याच्या पहिला आठवड्यात वनमहोत्सव साजरा केला जात असून, नुकतीच वनशक्ती या संस्थेतर्फे सुखभूमी ट्रस्ट यांच्या सहकार्याने वाडा-पालघर येथील लोहपे-पवारपाडा या गावांमध्ये वृक्षारोपण मोहीम आयोजित करण्यात आली होती.

मोहिमेत आंबा, जांभूळ, फणस, आवळा, जाम अशा स्थानिक वृक्षांच्या रोपांचे रोपण करण्यात आले. या मोहिमेत एक हजार स्थानिक वृक्षांचे रोपण वनशक्तीचे स्वयंसेवक आणि ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले. या वृक्षांपासून मिळणाऱ्या फळांचा उपयोग स्थानिक ग्रामस्थांना त्यांच्या उपजीविकेसाठी करता यावा. या वृक्षांपासून त्यांना उत्पन्नाचा स्रोत मिळून पर्यावरण संवर्धन व्हावे हा, या वृक्षारोपणाचा प्रामुख्याने उद्देश होता.

Hello Mumbai
Page No. 2 Jul 10, 2023
Powered by: erelego.com